# पोलीस आयुक्तालय, अमरावती

## ई - पोलीस पत्रिका

*दि. १३/११/२०१८* *अनु.क्र.२२९/१८*

## *(अमरावती शहर पोलीसांची २०१८ ची उद्दिष्टे)*

- *जागरूक व तत्पर पोलीस.*
- *नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.*
- *उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.*
- *महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.*
- *जातीय सलोखा वाढविणे.*
- *संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.*
- *रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण*
- *सुरक्षा.*
- *पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.*
- *आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.*
- *“सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू*

## <u>भाग - १</u>

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

### रजा

**१.जा.क्र.पोआअ/पशा-१/रजा मा.पोलीस आयुक्त/१२२७१/२०१८        अमरावती दि. ०६.११.२०१८**

विषय :- मा. पोलीस आयुक्त यांचे रजा कालावधीतील कार्यभाराबाबत.

**आदेश**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, श्री. संजयकुमार बाविस्कर, पोलीस आयुक्त अमरावती शहर यांना अत्यंत महत्वाचे कौटुंबिक कामाचे निमीत्य दि. १२.११.२०१८ ते दि. १३.११.२०१८ रोजीच्या दोन नैमित्तीक रजा दि. ०८.११.२०११ ते दि. ११.११.२०१८ रोजीच्या शासकीय सुटयांना जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यांत आलेल्या आहेत.

**२.जा.क्र.पोआअ/पशा-१/प्रसुती रजा-उंबरकर/१२२८६/२०१८  अमरावती शहर दि. ०६.११.२०१८**

**आदेश**

खालील नमुद महीला अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे १८० दिवस प्रसुती रजा, (विशेष रजा), रजा वेतनासह दि. १०.११.२०१८ पासुन मंजुर करण्यांत येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाव व हुदा** | **नेमणुक** | **नियुक्तीचा दिनांक** | **प्रसुतीची संभाव्य तारीख** | **प्रसुतीची रजा मंजुरीचा कालावधी** | **प्रसुतीची वेळ** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मपोउपनि. माधुरी उंबरकर | नियंत्रण कक्ष | २५.०९.२०११ | ०५.१२.२०१८ | १०.११.२०१८ ते दि. ०८.०५.२०१९ | पहीली प्रसुती |

**३.जा.क्र. पोआअ/पशा-पोउपआ-चव्हाण/१२२७९/२०१८    अमरावती शहर दि. ०६.११.२०१८**

**आदेश**

श्री. प्रदिप चव्हाण, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), अमरावती शहर दि. ०७.११.२०१८ व दि. ०८.११.२०१८ या शासकीय रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह उपभोगण्याची परवानगी देण्यांत येत आहे.

## वेतन/ वेतनवाढ/वेतन निश्चिती/सुधारीत वेतन निश्चिती

### सुधारीत वेतन निश्चिती

**४.जा.क्र.पोआअ/आस्था/वेनि.सुसेआप्रयो/१२२५९/२०१८        अमरावती दि. ०६.११.२०१८**

**आदेश**

**पोलीस हवालदार तांत्रीक /१०३४, सैय्यद अमिनोदीन सैय्यद अझिमुददीन, नेमणुक मोटार परिवहन विभाग, अमरावती शहर** यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन महाराष्ट्र राज्य, पुणे दि. २६.०९.२०१८ अन्वये यांना एकाच संवर्गात व एकाच पदावर सलग १२ वर्ष सेवा पुर्ण केल्यामुळे वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००/-+ ग्रेड वेतन रु.२८००/- मध्ये आश्वासीत प्रगती योजीना अंतर्गत पहीला लाभ देण्यांत आलेला असल्याने त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार त्यांची वेतन निश्चिती करुन आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## शिक्षा/निलंबन/पुनःस्थापीत/बक्षिस

## शिक्षा

**१.क्र.पोआअ/विचौ-२/परेड गैरहजर/आदेश/पोशि-१७८० भिमकर+९/१२३१३/२०१८ दि. १२.११.२०१८**

**आदेश**

खालील पोलीस कर्मचारी यांना **सक्त ताकीद** शिक्षा देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | नेमणुक | थोडक्यांत कसुरी |
|---|---|---|---|
| ०१ | १.पोशि. अनिरुध्द भिमकर/१७८०<br>२.पोशि. राजीक रायलीवाले/१८६८<br>३.पोशि. सुरज मेश्राम/१८५५<br>४. पोशि. निखील गेडाम/१२९७<br>५. पोशि. रुपेश अंभोरे | आरसीपी | दि. १६.०७.२०१८ रोजी सकाळी ०६.१५ वा. रापोनि. यांनी परेडवर गणणा असता सदर कर्मचारी गैरहजर मिळुन आले. |
| ०२ | १.पोशि. अजय चिमणकर/२२०<br>२.पोशि. रोशन वासेवाय/२८७<br>३. पोशि. स्वप्नील पापळकर/१८२०<br>४. पोशि. सचिन मोरे/१८६१<br>५. पोशि. आकाश पवार/११९३ | क्युआरटी | दि. १६.०७.२०१८ रोजी सकाळी ०६.१५ वा. रापोनि. यांनी परेडवर गणणा असता सदर कर्मचारी गैरहजर मिळुन आले. |

**२.क्र. पोआअ/विचौ-२/रजा कालावधी निश्चित/आदेश/ऐएसआय५४२ बन्सोड/१२३१७/ दि. १२.११.१८**

**आदेश**

खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधीमध्ये कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहील्याने दि.०९.०३.२०१८ रोजी आज्ञांकीत कक्षेत त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत येत आहे. त्यांचा सदरचा कालावधी निश्चित होणबाकी होते. त्याअनुषंगाने त्यांनी सादर केलेल्या वैदयकीय उपचाराचे कागदपत्राचे अवलोकन करता त्यांचा रजा कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व हुदा ब.नं. | नेमणुक | गैरहजर कालावधी | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| ०१ | सपोउपनि. अशोक बनसोड/५४२ | पोमुख्या. | दि. १२.०२.२०१८ ते दि. ०९.०३.२०१८ एकुण २६ दिवस | दि. १२.०२.२०१८ ते दि. ०९.०३.२०१८ रोजी पावेतो एकुण २६ दिवस अर्जित रजा |

**३.क्र. पोआअ/विचौ-२/गैरशिस्त/आदेश/पोशि-३१३ शाह/१२३१६/२०१८ अमरावती दि. १२.११.२०१८**

**आदेश**

**कसुरदारचे नावं :-** पोशि. शाकीर शाह तकदीर शाह, शवाशा पश्चिम विभाग, अमरावती शहर

**थोडक्यांत कसुरी :-**

दि. २४.०८.२०१८ रोजी श्याम चौक येथे सकाळी ०९.०० ते दि. २१.०० वा पावेतो तुमची व महीला पोना. १२० ज्योत्स्ना यांची डयुटी वाहतुक नियमनकरीता लावण्यांत आली असता, सदर डयुटी दरम्यान एक दुचाकी वाहनावर तिन ईसम रहदारीतुन जातांना महीला पोना/१२० यांना दिसुन आल्याने त्यांनी त्या वाहनास अडवून तुम्हास त्यांचेकडुन चालान देण्यांतस सांगितले. परंतु तुम्ही चालान न करता काही संशयास्पद त्यांच्या सोबत बोलचाल करीत असल्याने दिसुन आल्याने तिऱ्हाईत इसम याने सदर घटनेची मोबाईलव्दारे रेकॉर्डींग करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागास तक्रार दिली. सदरच्या तुमच्या या गैरकृत्यामुळे पोलीसांची प्रतिमा जनमानसात मलीन झाली आहे.

सदर कृत्याबाबत**. सक्त ताकीद** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**४.क्र. पोआअ/विचौ-२/गैरहजर/आदेश/पोशि-१४२९, मोहोड/१२३१४/२०१८ अम. दि. १२.११.२०१८**

**आदेश**

**कसुरदाराचे नांव :-** पोशि/१४२९, निलेश मोडोड, पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर

**थोडक्यांत कसुरी :-**

दि. ०८.०६.२०१८ रोजी पो.स्टे. हदीत बीटमार्शल डयुटी लावण्यांत आली असता, सदर डयुटी दरम्यान तुम्ही तुमचे सहकारी पोशि/१५१९ यांना जेवण करण्याकरीता जातो म्हणुन सांगुन परत न येता परस्पर गैरहजर असल्याचे निदर्शनास आले.

सदर कसुरीबदल **सक्त ताकीद** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**५.क्र. पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/सुधारीत आदेश/मपोना-८६४ ठाकरे/१२३१५/ दि. १२.११.२०१८**

**सुधारीत आदेश**

**कसुरदाराचे नांव :-** १. मपोना. लता रंगराव ठाकरे/८६४, पो.स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर
२. मपोशि. संगिता भालेराव/४४०, पो.स्टे. फ्रेजरपुरा

३. मपोशि. उषा जुमळे/१०८९, पो.स्टे. फ्रेजरपुरा
४. मपोशि. सरोज जवंजाळ/२८४, पो.स्टे. फ्रेजरपुरा
५. पोशि. राजेंद्र पारडे/१७३४, शवाशा पश्चिम विभाग
६. पोशि. प्रदीप सावरकर/१६, शवाशा पश्चिम विभाग
७. पोहवा. विजय सिताराम राठोड/१३६, नागपुरी गेट
८. पोशि. किशोर भिकुजी धुर्वे/१३४७, नागपुरी गेट
९. पोशि. आशिष ठाकरे, ४४५, वलगांव

**थोडक्यांत कसुरी :-**

दि. ०९.०७.२०१८ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय येथे शेळी मेंढपाळ धनगर समाज यांचा मोर्चा बंदोबस्त डयुटी लावण्यांत आली असता, सदर डयुटी दरम्यान बंदोबस्त प्रभारी अधिकारी पो.नि. ठाकरे यांनी चेक केले असता, तुम्ही सदर डुयटीवरुन तुमच्या वरिष्ठांची पुर्वपरवानगी न घेता परस्पर स्वमर्जीने कर्तव्यावर गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे. या बेजबाबदारपणाचे कसुरीबदल त्यांना **एक दिवस विनावेतन व सक्त ताकीद** उपरोक्त वाचा मधील नमुद शिक्षा देण्यांत आली होती. परंतु सदरची शिक्षा माफ होणेबाबत पुर्नविलोकन विचार विनंती अर्ज सादर केल्याने प्रस्तुत प्रकरणात दिलेली शिक्षा व अर्जा मध्ये सादर केलेले नविन मुददे याबाबत बारकाईने सत्यता पडताळणी करुन व भविष्याचा साकल्याने विचार करुन उपरोक्त प्रमाणे करण्यांत आलेली एक दिवस विनावेतन व सक्त ताकीद या आदेशा ऐवजी विशेष बाब म्हणुन सुधारीत आदेश उपरोक्त कसुर प्रकरणी शिक्षेत बदल करुन **एक दिवस विनावेतन (दि. ०९.०७.२०१८) व सक्त ताकीद ही शिक्षा रदद करण्यांत येत आहे.**

**६.क्र. पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/आदेश/पोशि-१४३९/१२३१८/अम. दि. १२.११.२०१८**

**आदेश**

**कसुरदाराचे नांव :-** १. पोशि. प्रदीप लोणारे१४३९, पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर
२. पोशि. मनिष निशीबकर/१८४७, पोलीस मुख्यालय
३. पोशि. गुरुदत्त राठोड/१३२, पोलीस मुख्यालय
४. पोशि. चिन बगाडकर/३६, बडनेरा
५. पोशि. गिरीश सरोदे/१६५३, नांदगांव पेठ
६. पोशि. सागर चव्हाण/९८९, भातकुली

**थोडक्यांत कसुरी :-**

दि. ०१ मे महाराष्ट्र दिन परेडकरीता निवड करण्यांत आली असतांना तुम्ही दि. ०१.०५.२०१८ रोजी ०६.०० वा पासुन कोणत्याही वरिष्ठांची परवानगी न घेता अतिमहत्वाचे परेड पथकामधुन अनधिकृतपणे गैरहजर राहीले.

सदरचा गैरहजर कालावधी **दि. ०१.०५.२०१८ रोजीचा एक (१) दिवस असाधारण रजा (विनावेतन) मंजुर करण्यांत येत आहे.**

अशाप्रकारे शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असतांना सुध्दा उपरोक्त प्रमाणे अनधिकृतपणे गैरहजर राहुन गैरवर्तणुक केली असल्याने **सक्त ताकीद** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**निवासस्थान/इमारत संबधी/संकीर्ण**

**निरंक**

## वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

खालील नमुद पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचा कार्यालयीन अभिलेखानुसार त्यांचे नावासमोर दर्शावलेल्या तारखेस वाढदिवस असल्याने त्यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर तसेच पोलीस आयुक्तलयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे तर्फे वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा देण्यात येत आहे. तसेच वाढदिवस असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.

| अ.क्र. | पदनांम | ब.नं. | पोलीस अधिकारी कर्मचारी यांचे नाव | नेम णुक | वाढदिवस दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोशि. | १६६० | श्री. सागर गोगटे | श्वान पथक | १३.११.२०१८ |

**( दे. बा. राठोड )**
**प्रशासक ीय अधिकारी**
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

प्रत, पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक , आस्थापना शाखा यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता